# वि.दि.दावा क्र. ०१/२०२३ मधील निशाण क्र. ४४० वर आदेश पारीत

(बन्सी घाडगे //विरुध्द// महाराष्ट्र शासन वगैरे)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १५ यांनी चौकशी कामी पुढील तारीख मिळावी या साठी दिलेला आहे. वादी तर्फे प्रस्तुत अर्जास कठोर आक्षेप नोंदविण्यात आला.

प्रकरण हे पंचवीस वर्षा पेक्षा जुने आहे. प्रतिवादी क्र. १५ हे वेळोवेळी विविध कारणास्तव तारखा घेवून प्रकरण लांबणीवर टाकत आहेत. ही बाब प्रतिवादी यांनी दिलेल्या अर्जावरुन दिसून येते. आज रोजी प्रतिवादी यांनी त्यांचे विधिज्ञ काही अपरिहार्य कारणा मुळे गैरहजर असल्याचे नमुद केलेले आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र. १५ यांचे साक्षीदार हे आज रोजी न्यायालयात साक्षी कामी हजर नाहीत. या वरुन ही बाब दिसून येते की, प्रतिवादी हे साक्षीदार यांना हजर न ठेवता चौकशी कामी पुढील तारीख मागत आहेत. या वरुन ही बाब स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १५ हे प्रकरण लांबणीवर टाकत आहेत. केवळ प्रकरणात गुंतागुंत निर्माण होवू नये व नव्याने त्याच बाबीच्या अनुषंगाने  नविन वाद निर्मिती होवू नये ही बाब लक्षात घेता शेवटची संधी म्हणुन रु. २५०/- चे दंडासहीत प्रकरण दि.१५-०४-२०२६ रोजी चौकशी कामी ठेवण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद वादी व प्रतिवादी यांनी घेवून पुराव्याकामी दि. १५-०४-२०२६ रोजी हजर रहावे.

SANJAY MOTIRAM GHUGE

Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2026.04.13 12:33:50 +0530

स्थळ : करमाळा

दि.१३-०४-२०२६

(एस.एम.घुगे)

दिवाणी न्यायालय, व. स्तर, करमाळा